**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________

   (Name) ____________________

2. (Signature) ____________________

   (Name) ____________________

**Answer Sheet No. :** ..............................................

(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | | |

(In figures as per admission card)

**Roll No.** ____________________

(In words)

**Test Booklet No.**

**D – 3804**

PAPER – II

# MARATHI

**Time : 1¼ hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **16** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page and also on the Answer Sheet given inside this booklet.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the question booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Serial No. of the booklet should be entered in the Answer-sheets and the Serial No. of Answer Sheet should be entered on this Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ⬤ (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the Answer Sheet given **inside the Paper I booklet only**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is NO negative marking.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर तथा इस पुस्तिका के अन्दर दिये गये उत्तर पत्रक पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या उत्तर-पत्रक पर अंकित करें और उत्तर-पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं। आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** (A) (B) ⬤ (D)

   जबकि (C) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये** उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं। यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते है, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर उत्तर-पुस्तिका निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तर के लिए अंक नहीं काटे जायेंगे।**

# MARATHI
# मराठी
## PAPER – II
## प्रश्नपत्र – II

**नोट :** इस प्रश्नपत्र में **पचास** (50) बहु-विकल्पीय प्रश्न हैं। प्रत्येक प्रश्न के **दो** (2) अंक हैं। **सभी** प्रश्नों के उत्तर दीजिए।

1. पंढरपूरचा शिलालेख कोणत्या शकातील आहे?
   (A) 1242
   (B) 1233
   (C) 1271
   (D) 1317

2. "चौघिं चालत भीतरी व्दिजवरीं ओवालिला सुर वरिं" ही पंक्ती कोणत्या शिलालेखावर आढळते?
   (A) नेवासे शिलालेख
   (B) कान्हेगाव शिलालेख
   (C) पाटण शिलालेख
   (D) वेळापुर शिलालेख

3. भारतात चार भाषाकुलांतील भाषा बोलल्या जातात, मराठी ही इंडोयुरोपियन भाषाकुलातील भाषा आहे.
   (A) विधानाचा उत्तरार्ध चूक आहे.
   (B) विधानाचा पूर्वार्ध चूक आहे.
   (C) संपूर्ण विधान बरोबर आहे.
   (D) संपूर्ण विधान चूक आहे.

4. सर्व भाषांना समान अशी काही मूलभूत तत्त्वे असतात व या तत्त्वांचे मिळून 'सर्वनिष्ठ व्याकरण' बनते हा सिध्दान्त कोणी मांडला?
   (A) ग्रियर्सन
   (B) हॅरिस
   (C) ब्लूमफील्ड
   (D) चॉम्स्की

5. बातमी हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला?
   (A) फार्सी
   (B) अरबी
   (C) उर्दू
   (D) हिंदी

6. खर्च हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला?

(A) फार्सी

(B) अरबी

(C) पोर्तुगीज

(D) तेलुगू

7. मराठी भाषेची उत्पत्ती कोणत्या भाषेपासून झाली असे सर्वसामान्यपणे मानले जाते?

(A) संस्कृत

(B) प्राकृत

(C) महाराष्ट्री अपभ्रंश

(D) मागधी

8. 'भाषिक क्षमता' ही संकल्पना कोणी मांडली?

(A) हॉकेट

(B) याकोब्सन

(C) सोस्यूर

(D) चॉम्स्की

9. काव्यग्रंथ व कवी यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | चांगदेवपासष्टी | 1. | दासोपंत |
| b. | गीतार्णव | 2. | मुकुंदराज |
| c. | विवेकसिंधू | 3. | एकनाथ |
| d. | भावार्थरामायण | 4. | ज्ञानेश्वर |
| | | 5. | रामदास |

(A) a-3, b-5, c-2, d-1

(B) a-4, b-1, c-2, d-3

(C) a-2, b-5, c-4, d-3

(D) a-3, b-5, c-1, d-2

10. "अंतरीचे धावें स्वभावें बाहेरी" ही पंक्ती कोणाची ?

(A) निवृत्तिनाथ

(B) निळोबा

(C) जनाबाई

(D) तुकाराम

11. 'एक बाजी सब पाजी, एक निजाम सब हजाम' हे उद्गार कोणत्या बखरीत आहेत ?

(A) भाऊसाहेबांची बखर

(B) सभासदाची बखर

(C) पेशवे बखर

(D) होळकरांची कैफियत

12. आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू, आणि ज्ञानी असे भक्तांचे चार प्रकार केले गेले आहेत, ते एकनाथांनी 'भावार्थरामायणा' त सांगितले आहेत.

(A) संपूर्ण विधान चूक आहे.

(B) पूर्वार्ध चूक आहे.

(C) पूर्वार्ध बरोबर आहे.

(D) संपूर्ण विधान बरोबर आहे.

13. 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली वास्तववादी कादंबरी मानली जाते कारण महाराष्ट्रातील विधवा स्त्रियांच्या दु:खाचे यथातथ्य चित्रण तीत आढळते, शिवाय तीवर हरिभाऊंचा प्रभाव पडला आहे.

(A) विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे.

(B) संपूर्ण विधान बरोबर आहे.

(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे.

(D) संपूर्ण विधान चूक आहे.

14. एकनाथांनी मराठीत भारुडांची रचना केली कारण त्यांना जनसामान्यांपर्यंत अध्यात्म विचार पोचवायचा होता, तसेच मुक्तेश्वरानेही भारुडे रचली होती.

(A) संपूर्ण विधान बरोबर आहे.

(B) संपूर्ण विधान चूक आहे.

(C) विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे.

(D) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे.

15. मराठी व्याकरणात शब्दांच्या जास्तीत जास्त जाती किती मानल्या आहेत ?

(A) दोन

(B) आठ

(C) चार

(D) सहा

16. विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी शब्दाचे जे रुप तयार होते त्यास काय म्हणतात ?

(A) समास

(B) आख्यात

(C) सामान्य रुप

(D) उभयान्वयी अव्यय

17. राम गणेश गडकरी यांनी विनोदी लेखनासाठी कोणते टोपणनाव घेतले ?

(A) अलाणे फलाणे

(B) ठणठणपाळ

(C) बाळकराम

(D) सुदामा

18. कोणत्या समीक्षापध्दतीत साहित्यकृतीच्या घाटास प्राधान्य दिले आहे ?

(A) आस्वादक

(B) समाजशास्त्रीय

(C) स्त्रीवादी

(D) रुपवादी

19. पुढीलपैकी कोणती बखर पानिपतच्या युध्दासंबंधी लिहिलेली नाही ?

(A) चित्रगुप्ताची बखर

(B) होळकरांची कैफियत

(C) भाऊसाहेबांची बखर

(D) पाणिपतची बखर

20. सर्वस्वी दलित चळवळीला वाहिलेले मराठीतील नियतकालिक कोणते ?

(A) हाकारा

(B) अस्मितादर्श

(C) ढोल

(D) युगकर्ता

21. ''घरिं एकच पणती मिणमिणती। म्हणुं नको उचल लगबग ती॥'' या काव्यपंक्ती कोणाच्या ?

(A) यशवंत

(B) इंदिरा संत

(C) भा. रा. तांबे

(D) वि.स.खांडेकर

22. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमांनुसार बरोबर आहे ?

(A) अथिरतिमहारथी

(B) अतिरथिमहारथी

(C) अतीरथीमहारथी

(D) अतीरतिमहारथी

23. अर्धशासकीय पत्रात संबंधितास उद्देशून कोणता मायना लिहाल ?

(A) रा. रा. .............

(B) प्रिय श्री ...........

(C) श्रीमान .............

(D) आदरणीय श्री ......

24. पुढील नाट्यकृती कालानुक्रमे लावा.

1. शांतता, कोर्ट चालू आहे

2. प्रेमा तुझा रंग कसा

3. किरवंत

4. संध्याछाया

(A) 3, 4, 2, 1

(B) 2, 1, 4, 3

(C) 1, 4, 3, 2

(D) 3, 2, 1, 4

25. महाभारतावरील पुढील ग्रंथांचा क्रम प्रकाशनानुसार लावा.

1. महाभारतातील व्यक्तिदर्शन
2. हा जय नावाचा इतिहास आहे
3. व्यासपर्व
4. महाभारत : एक सूडाचा प्रवास

(A) 2, 3, 1, 4
(B) 1, 2, 4, 3
(C) 3, 2, 1, 4
(D) 4, 3, 1, 2

26. पुढील वाद कालानुक्रमे लावा.

1. अत्रे-फडके वाद
2. वैद्य-गुणे वाद
3. धोंड - मालशे वाद
4. भारद्वाज - भिंगारकर वाद

(A) 4, 2, 1, 3
(B) 2, 3, 4, 1
(C) 3, 2, 1, 4
(D) 1, 3, 2, 4

27. पुढील खंडकाव्ये कोणत्या कालक्रमानुसार प्रसिध्द झाली ?

1. विरहतरंग
2. निर्वासित चिनी मुलास
3. मृगावर्त
4. युगायुगांचे सहप्रवासी

(A) 3, 4, 2, 1
(B) 2, 4, 3, 1
(C) 4, 3, 1, 2
(D) 1, 2, 4, 3

28. पुढीलपैकी कोणते नाटक भाषांतरित नाही?

(A) ऑथेल्लो

(B) विकारविलसित

(C) राजा लियर

(D) शारदा

29. पुढील साहित्यकृती आणि साहित्यनिर्माते यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | कमला | 1. | कृ.प्र.खाडिलकर |
| b. | गीतारहस्य | 2. | पु. शि. रेगे |
| c. | कीचकवध | 3. | वि. दा. सावरकर |
| d. | त्रिधा राधा | 4. | बा. गं. टिळक |
| | | 5. | कुसुमाग्रज |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 3 | 4 | 1 | 2 |
| (B) | 3 | 2 | 5 | 4 |
| (C) | 2 | 3 | 4 | 1 |
| (D) | 3 | 4 | 1 | 5 |

30. पुढील ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | आज्ञापत्र | 1. | फादर स्टीफन्स |
| b. | शतपत्रे | 2. | मोरोपंत |
| c. | ख्रिस्तपुराण | 3. | लोकहितवादी |
| d. | केकावली | 4. | रामचंद्रपंत अमात्य |
| | | 5. | मल्हार रामराव चिटणीस |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 4 | 3 | 1 | 2 |
| (B) | 4 | 5 | 1 | 2 |
| (C) | 5 | 3 | 1 | 4 |
| (D) | 4 | 5 | 2 | 1 |

31. पुढील सिध्दान्त आणि साहित्य मीमांसक यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | अनुकृतीचा सिध्दान्त | 1. | बा. सी. मर्ढेकर |
| b. | वाङ्मयीन महात्मता | 2. | मा. त्र्यं. पटवर्धन |
| c. | जिज्ञासापूर्ती | 3. | ॲरिस्टॉटल |
| d. | वाक्यं रसात्मकं काव्यम्। | 4. | विश्वनाथ |
| | | 5. | ना. सी. फडके |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 2 | 5 | 1 | 3 |
| (B) | 3 | 1 | 2 | 4 |
| (C) | 2 | 1 | 5 | 4 |
| (D) | 3 | 2 | 5 | 4 |

32. पुढील काव्यपंक्ती व कवी यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | नाचू कीर्तनाचे रंगीं।<br>ज्ञानदीप लावूं जगीं॥ | 1. | रामदास |
| b. | हेचि दान देगा देवा।<br>तुझा विसर न व्हावा॥ | 2. | नामदेव |
| c. | तुजविण शीण होतो।<br>धाव रे धाव आतां॥ | 3. | तुकाराम |
| d. | थोर नवलाव जाला।<br>वांझें पुत्र प्रसवला॥ | 4. | जनाबाई |
| | | 5. | मुक्ताबाई |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 2 | 3 | 1 | 5 |
| (B) | 2 | 4 | 3 | 1 |
| (C) | 2 | 4 | 1 | 5 |
| (D) | 5 | 3 | 2 | 4 |

**33.** स्त्रियांच्या पुढील आत्मकथनांचा प्रकाशनकालानुसार क्रम लावा.

1. माझे पुराण
2. सांगत्ये ऐका
3. आमच्या आयुष्यातील काही आठवणी
4. नाच ग घुमा

(A) 3, 1, 2, 4

(B) 1, 3, 4, 2

(C) 2, 1, 4, 3

(D) 1, 4, 3, 2

**34.** पुढील कवितेच्या ओळी व कवी यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | मी महाकवी दु:खाचा प्राचीन नदीपरि खोल<br>दगडाचे माझ्या हाती वेगाने होते फूल | 1. | कुसुमाग्रज |
| b. | रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल | 2. | केशवसुत |
| c. | दिव्य रसी विरणे जीव जीवित हे याचे नाव | 3. | ग्रेस |
| d. | प्राप्तकाल हा विशाल भूधर<br>सुंदर लेणी तयात खोदा | 4. | बालकवि |
| | | 5. | मर्ढेकर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 2 | 3 | 5 | 1 |
| (B) | 3 | 1 | 4 | 2 |
| (C) | 2 | 1 | 4 | 5 |
| (D) | 3 | 4 | 2 | 1 |

**पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्याः ( 35-38 )**

सामाजिक समता ही सामाजिक सुधारणा ठरविण्याची मुख्य कसोटी आहे, हे आपण जाणताच. सामाजिक विषमतेने जर्जर झालेल्या आपल्या समाजाला सामाजिक समतेची दीक्षा देणे हा सामाजिक परिषदेच्या कार्याचा प्रमुख उद्देश आहे याबद्दल मला समाधान वाटते. परंपरागत रुढीने चालत आलेला व माणसामाणसांना संघटितपणे एकमेकांविरुद्ध वागण्यास शिकविणारा जातिवाद हा भारताला शाप ठरलेला आहे. स्वराज्य प्राप्तीनंतर भारतीय नागरिक स्वतंत्र झाला असला, तरी खऱ्या अर्थाने तो अजून भारतीय बनावयाचा आहे. भारत हे राष्ट्र बनले असले तरी प्रत्येक भारतवासी जातपात विसरुन खऱ्या अर्थाने जेव्हा भारतीय बनेल तेव्हाच राष्ट्र पदवीला आमचा देश पात्र होणार आहे. काही लोकांना, पूर्वी जातीधर्म हाच धर्म असे वाटत होते. परंतु ऋग्वेदकाळी जातिसंस्था अस्तित्वात नव्हती ही गोष्ट संशोधनाने आता शाबीत झाली आहे. त्यानंतर त्या त्या परिस्थितीत गुणकर्म विभाग म्हणून वर्ण आले. आपल्या कार्याने वर्ण बदलताही येत असत ही गोष्ट विश्वामित्राच्या उदाहरणावरुन दिसून येते. पुढे तर गुणकर्माचीही कल्पना गेली व जन्मावरुन दर्जा ठराविण्याचा हास्यास्पद प्रकार सुरु झाला. हा मुलगा अमुक खोलीत जन्मला म्हणून उच्च तर दुसरा अमुक खोलीत जन्मला म्हणून कनिष्ठ, असा भेदभाव आपल्या मुलामुलांतच एखादे कुटुंब करु लागले म्हणजे ते कुटुंब रसातळाला जाणारच. अशाच प्रकारची जातिभेदाने आमच्या राष्ट्रकुटुंबाची हानी केली आहे. सुदैवाने भूतदया, समाजसुधारकांचे कार्य, पुरोगामी राजकारण वगैरे गोष्टींमुळे जातिभेदावर आधारलेल्या आमच्या समाजाची अधोगती थोडीफार थोपविली गेली. आता तर सामाजिक समतेवर आधारलेली राज्यघटना भारताने मंजूर केली आहे. त्यामुळे जातिभेदाच्या भिंती ढासळण्याच्या मार्गावर आहेत असेच कोणीही अनुमान काढील. परंतु लोकशाही समतेवर आधारलेली घटना असूनही आणि त्याप्रमाणे समाजाला पुढे नेण्याचे प्रयत्न चालू असूनही या काळात जातिभेदाचे भेसूर परिणाम काही प्रांतांत आजही आपणास पहावयास मिळत आहेत. त्यामुळे जातिभेद निर्मूलनाचे कार्य हे आज ऐतिहासिक निकडीचे कार्य झाले आहे. परंतु जातीय संघर्षाला कधी कधी जे आवाहन करण्यात येते त्यामुळे राजकीय क्षेत्रातील मंडळींना निर्विकारपणे हा प्रश्न हाताळणे कठीण जाते. म्हणून सामाजिक सुधारणेच्या कार्याला वाहून घेतलेले लोकच अशा प्रसंगी नवा विश्वास व सामाजिक एकतेची नवी जाणीव समाजाच्या गळी अधिक चांगल्या प्रकारे उतरवू शकतील असे मला वाटते.

**35.** सामाजिक सुधारणा घडविण्याचा मुख्य उपाय कोणता?

(A) सामाजिक समता प्रस्थापित करणे

(B) परंपरागत जातिवाद जोपासणे

(C) जन्मावरुन दर्जा ठरविणे

(D) जातीय संघर्षाला आवाहन करणे

**36.** आमचा देश राष्ट्रपदवीला केव्हा पात्र होईल?

(A) जातिधर्म हाच धर्म असे प्रत्येकाला वाटेल तेव्हा.

(B) प्रत्येकजण जातपात विसरुन भारतीय बनेल तेव्हा.

(C) उच्च-कनिष्ठ असा भेदभाव वाढेल तेव्हा.

(D) समाजाला पुढे नेण्याचे प्रयत्न चालू झाले म्हणजे.

37. विश्वामित्राच्या उदाहरणावरुन कोणती गोष्ट स्पष्ट होते ?

(A) जन्मावरुन दर्जा ठरत असतो

(B) जातिभेदाने राष्ट्रकुटुंबाची हानी होते

(C) आपल्या कार्याने वर्ण बदलता येतो

(D) सामाजिक समतेवर आधारित राज्यघटना मंजूर होऊ शकते.

38. आपल्या समाजाची अधोगती कशामुळे थोपविली गेली ?

(A) जातीय संघषाली आवाहन केल्यामुळे

(B) सामाजिक एकतेची नवी जाणीव उत्पन्न झाल्यामुळे

(C) गुणकर्म विभाग म्हणून वर्णव्यवस्था आल्यामुळे

(D) भूतदया, समाज सुधारकांचे कार्य आणि पुरोगामी राजकारण यामुळे.

39. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | ध्वन्यालोक | 1. | विश्वनाथ |
| b. | साहित्यदर्पण | 2. | वामन |
| c. | काव्यालंकारसूत्र | 3. | दंडी |
| d. | काव्यादर्श | 4. | आनंदवर्धन |
| | | 5. | जगन्नाथ |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 3 | 4 | 5 | 1 |
| (B) | 3 | 4 | 1 | 2 |
| (C) | 4 | 1 | 2 | 3 |
| (D) | 4 | 1 | 5 | 3 |

**40.** वचने व वचनकार यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | काव्यास्यात्मा ध्वनि: । | 1. | वामन |
| b. | तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुन: क्वपि | 2. | विश्वनाथ |
| c. | संदर्भेषु दशरूपकं श्रेय: । | 3. | मम्मट |
| d. | वाक्यं रसात्मकं काव्यम् । | 4. | आनंदवर्धन |
| | | 5. | भामह |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 2 | 1 | 4 | 3 |
| (B) | 4 | 3 | 1 | 2 |
| (C) | 3 | 4 | 1 | 2 |
| (D) | 4 | 5 | 2 | 1 |

**41.** मळमळ-बडबड, ऊन-ऊन, लाल लाल ही.....................पदे होत.

(A) सामासिक

(B) व्दंव्द

(C) पूर्णाभ्यस्त

(D) विकल्पबोधक

**42.** गडबड, सटरफटर, लगबग ही ....................पदे होत.

(A) अन्त:पदप्रधान

(B) समुच्चयबोधक

(C) समाहारबोधक

(D) अंशाभ्यस्त

**43.** एखाद्या भाषेत एकरुप श्रवणप्रत्यय देणाऱ्या आंशिक उच्चारसाम्य असलेल्या व अर्थभेदक क्षमता नसलेल्या स्वनांतरांचा वर्ग म्हणजे काय ?

(A) रुपिम

(B) कारक

(C) स्वनिम

(D) धातू

44. समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द आणि अनेकार्थी शब्द हे कशाचे प्रकार होत ?

(A) ध्वनीचे
(B) रुपांचे
(C) अर्थाचे
(D) उच्चाराचे

45. तांब्यांच्या प्रेमविषयक कवितेचे वर्णन पुढीलपैकी कोणत्या शब्दांनी करता येईल ?

(A) एकाकीपणाने भारलेली
(B) सफल प्रेमाने तृप्त असलेली
(C) विरहाने व्याकुळ असलेली
(D) मीलनाने बेधुंद झालेली

46. काव्यनिर्मितीची जनक कारणे कोणती ?

(A) प्रतिभा आणि व्युत्पत्ती
(B) रस आणि ध्वनी
(C) अलंकार आणि वक्रोक्ती
(D) औचित्य आणि अभ्यास

47. 'मराठी सारस्वत' या कोशाची रचना अनंत लक्ष्मण जोशी यांनी केली असून हा कोश म्हणजे वि.ल. भावे यांच्या 'महाराष्ट्र-सारस्वत' या ग्रंथाची प्रतिकृती म्हणता येईल.

(A) सर्व विधान बरोबर आहे.
(B) विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे.
(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे.
(D) संपूर्ण विधान चूक आहे.

48. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून कादंबरीलेखन कोणी केले ?

(A) वि. स. खांडेकर
(B) पु. शि. रेगे
(C) श्री. व्यं. केतकर
(D) श्री. ना. पेंडसे

49. 'अभिधेने व्यक्त झालेल्या अर्थामध्ये अन्वय प्रतीत होतो'; हे कुमारीलभट्टाचे मत कोणत्या संज्ञेने उल्लेखिले जाते ?

(A) अन्विताभिधानवाद

(B) अभिहितान्वयवाद

(C) अखंडार्थवाद

(D) चिद्विलासवाद

50. 'डॉ. केतकर' आणि 'डॉ. पटवर्धन उर्फ माधव जूलियन' या दोन चरित्रग्रंथाचे लेखक कोण ?

(A) जया दडकर

(B) सु. रा. चुनेकर

(C) द. न. गोखले

(D) धनंजय कीर

- o O o -

**Space For Rough Work**